ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 4 | DECEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

साठोत्तरी ग्रामीण कविता

प्रा. डॉ.राजाराम प्रभाकर गावडे
मराठी विभाग प्रमुख, कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय
इंदापूर, जि. पुणे.

इंग्रजांच्या आगमनाने आपल्या देशात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. समाजातून गतिमान झाले. त्याचा परिणाम लोकमनावर होऊ लागला. तो परिणाम साहित्यावर झालेला दिसून येतो. सोळाव्या शतकापासूनच इंग्रजांचा, फ्रेंचांचा, पोर्तुगीजांचा व्यापार—उद्योग वाढत होता. व्यापारी सवलती मिळविणे, काही स्थळे हस्तगत करणे, ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे, राजकारणात भाग घेणे हे प्रकार सुरु झाले. ज्ञानविषयी जिज्ञासा होती. या सर्व बाबींमुळे हजारो किलोमीटरवरुन इंग्रजांनी भारतात घट्ट पाय रोवले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, इ. मूल्यांची जोपासना होऊ लागली. सुरवातीच्या काळात इंग्रजी सत्तेचे स्वागत झाले. वैचारिक जागृती झाली. याला कारण इंग्रजांचे नवे उदारमतवादी धोरण. दळणवळणाच्या वाढत्या प्रसारामुळे जातिभेदाच्या कल्पना शिथिल झाल्या. मुंबई विद्यापीठाच्या शिक्षण क्रमातून पहिली पिढी बाहेर पडली. इंग्रजी, समीक्षक, लेखक, कवी, कादंबरीकार या सर्वांची महाराष्ट्रीयन विचारवंतांवर छाप पडली. मुद्रणकलेचा शोध लागला. वृत्तपत्रे, मासिके सुरु झाली. 'दर्पण, मुंबई अखबार, प्रभाकर, ज्ञानदर्शन, उपदेश चंद्रिका, इ. नियतकालिके निघाली. 'ज्ञानप्रकाश इंदूप्रकाश' प्रसिध्द होऊ लागले. धार्मिक प्रबोधन झाले. महात्मा फुले, रावबहादूर गोपाळ हरि देशमुख, बाळशास्त्री जांभेकर इ. विचारवंतांनी जून्या चालीरिती रुढींवर हल्ला केला.

शेतकऱ्यांच्या, विधवांच्या समस्या, हिंदू धर्मातील कित्येक रुढी, परंपरा, व्रतवैकल्य यावर हल्ला सुरु झाला. सार्वजनिक सत्यधर्म, सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. 'ब्राम्हणांचे कसब, शेतकऱ्याचा आसूड, तृतीय रत्न इ. साहित्यकृतींनी समाज परिवर्तनास सुरवात केली. कारण ग्रामीण साहित्याची चळवळ जरी १९६० पासून सुरु झाली असली तरी तिची पाळेमुळे संत साहित्यातही दिसतात. त्यापेक्षा महात्मा फुलेंच्या लेखनात अधिक दिसून येतात.एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून पुढे आपल्याकडे औद्योगिकरणाला प्रारंभ झाला. १८८० व्या दरम्यान आपल्याकडे मोठया प्रमाणात कापड कारखाने उभे राहू लागले. इतरही उद्योगधंदे शहरांमधून स्थिर होऊ लागल्या. परिणामत: आपल्या देशात एक प्रक्रिया सुरु झाली. ती प्रक्रिया म्हणजे आपापले खेडे सोडून लोक हळूहळू शहरांकडे जाऊ लागले. इंग्रजांनी आणलेल्या सार्वत्रिक शिक्षण पध्दतीचा परिणाम आपल्या देशावर झाला. या शिक्षपध्दतीमुळे आपल्या देशाचे स्वरुप बदलायाला मदत झाली. ग्रामीण भागातही शिक्षणाचा प्रसार होत गेला. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार हा स्वातंत्र्यानंतर झपाटयाने झाला.

मराठी वाङ्मयांमध्ये ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला १९२० नंतर प्रारंभ झाला असला तरीही ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणा मात्र संत साहित्यातही दिसून येतात. उदा. मूळ संस्कृतातील 'गीता' प्राकृतात सांगून, अमृतालाही जिंकण्याचे बळ मराठीत कसे आहे हे सांगून प्राकृताचा पुरस्कार करणाऱ्या ज्ञानदेवाची 'बंडखोरी' काय सुचवित होती? लोकजीवनात नांदणारी माय—मराठी व्यवहाराची, अनुभवाची,

लोकजाणिवेची आणि लोकसंवेदनेची बनली होती. तसेच महानुभावपंथीयांची मराठी यामध्येही ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणा सापडतात. एकनाथांची भारुडे ही सुध्दा ग्रामीण साहित्याचे मोठेपणच वर्णन करणारी कविता आहे असेही म्हणता येईल. तरीही १९२० नंतर इंग्रजांच्या धोरणामुळे 'ग्रामीण' जीवन ठळकपणे वेगळे असल्याचे जाणवू लागले. म.गांधी यांनी 'खेडयाकडे चला' अशी हाक या ऐतिहासिक टप्प्यावर दिली. त्याचे कारणही या बदलत्या जीवनातच आहे. बदलत्या अर्थव्यवस्थेत आहे. म्हणूनच 'ग्राम इलाखा' केंद्रस्थानी ठेवून देशाच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. नव्या राजवटीमुळे, नव्या अर्थव्यवस्थेमुळे आणि औद्योगिकरणामुळे ग्रामीण जीवनात अनेकविध प्रश्न निर्माण झाले याची नोंद साहित्यामध्ये होवू लागली.

१९२० नंतर 'ग्रामीण' आणि 'शहरी' या दोन संज्ञा अधिक अर्थपूर्ण झाल्या. म.गांधी यांच्याबरोबर डाव्या चळवळींना आपल्या देशात प्रारंभ झाला आणि सदाशिव पेठेबाहेर फार मोठा समाज आहे याचे भान येवू लागले. ग्रामीण जीवनाचे चित्रण केले पाहिजे असे मराठी लेखक व कवी म्हणू लागले. मराठीत जानपद गीतांच्या रुपाने ग्रामीण कविता येऊ लागली. याच गीतांना किसान गीते, गोपगीते असेही म्हटले जात होते.

१९२० नंतर ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला. कविता, कथा, कादंबरी या तीन वाङ्मय पकारांमधून ग्रामीण जीवनाच्या चित्रणाला प्रारंभ झाला. ग.ल. ठोकळ, र.वा.दिघे, वि.वा. हडप, सोपानदेव चौधरी, यशवंत, गिरीश अशी काही कवी व लेखकांची नावे सांगता येतील. ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे लेखन आपल्या वैशिष्टयांमुळे लोकांना आवडू लागले. शेती—शेतकरी, काळी—पांढरी यांचेही चित्रण मराठी ग्रामीण साहित्यात सुरु झाले. म्हणजे युगानयुगापासून शेती केंद्रस्थानी असल्यामुळे तो केवळ उपजीविकेचा व्यवसाय उरला नाही तर त्यातून एक संपूर्ण संस्कृतीच निर्माण झाली. भावबंध निर्माण झाले. विधी निर्माण झाले. मूल्ये निर्माण झाली आणि या सगळयांमधून जगण्याची एक रीत निर्माण झाली. ही रीत म्हणजे ग्रामीणतेचा मध्यबिंदू होय. या मध्यबिंदूभोवती सण—उत्सव, कालचक्र, सगळे जगणे आणि जनावरेही निगडीत झाली. ग्रामीणता म्हणजे स्वतंत्र जगण्याची रीत झाली. स्वतंत्र संस्कृती झाली. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी अशा विविध साहित्याच्या प्रवाहानी आपले अस्तित्व अधिक मजबूत केले. म्हणजे 'मजल्यांवर उभी असणारी विषमव्यवस्था नष्ट झाली पाहिजे' असे दलित साहित्य चळवळीला वाटते तर 'सर्व प्रकारच्या शोषणातून ग्रामीण समाज मुक्त झाला पाहिजे' असे ग्रामीण साहित्य चळवळीला वाटते. तर 'युगानयुगाच्या सुरुषसत्ताक व्यवस्थेचया जोखडातून स्त्रीची मुक्ती झाली पाहिजे' असे स्त्रीवादी साहित्याच्या चळवळीला वाटते.

थोडक्यात इंग्रजी शिक्षणाच्या सार्वत्रिक परिणामामुळे ग्रामीण जग बदलायला लागले. म.फुले, म. गांधी यांच्या सामाजिक कार्यामुळे सत्शोधक समाज, ब्राम्हणेतर पक्ष, शेतकरी कामगार पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष यामुळे ग्रामीण माणसाची जाणीव अधिक टोकदार झाली.ग्रामीण कविता हा प्रकार इंग्रजीतील 'पेस्टोरल पोएट्री' वरुन मराठीत आला. वर्डस्वर्थच्या 'सॉलिटरी रीपर' सारख्या कवितांवरुन बेतलेल्या ग्रामीण कविता अनेक मराठी कवींनी लिहिलेल्या आहेत. ग.ल. ठोकळ हे थॉमस हार्डीपासून प्रेरणा मिळाल्याचे कबूल करतात. इंग्रजी साहित्याचे अनुकरण किंवा भाषांतर करुन त्याला मराठी साजशृंगार चढवून हे माझेच आहे असे म्हणणार अनेक लेखक मराठीत आहेत असे 'पाटलाची लंडणवारी' लिहिणारे लेखक आनंद पाटील यांनी म्हटले आहेच की'. असो् चंद्रशेखरांनी 'सफोल मिरॅकल' चे 'काय हो चमत्कार' हे रुपांतर केले. म्हणजे आरंभीची ग्रामीण कविताही इंग्रजीवरुन प्रेरणा घेताना दिसते. १९३३ साली 'सुगी' या काव्य संग्रहात तीस—पस्तीस कवीनी भाग घेतलेला आहे. मराठीत प्रसिध्द झालेला ग्रामीण कवितांचा हा पहिलाच संग्रह. परंतु अधूनमधून लेखणीला बदल म्हणून, ग्रामीण कविता लिहिण्याची हौस म्हणून या कवितांचे लेखन बहुतेक कवींनी केलेले असावे असे आनंद यादव म्हणतात. म्हणून बहुसंख्य ग्रामीण कवितात यापलीकडे काही वेगळी प्रेरणा जाणवत नाही.

गिरीशांची कविता ही ढोबळ वर्णनापलीकडे जात नाही. यशवंतांची कविताही सांकेतिक वर्णनात, कल्पना रम्यतेत व वरवरच्या नाटयात रमलेली दिसते. म्हणजे सुरुवातीची ग्रामीण कविता ही वास्तवतेजवळ जाणारी नाही असेच काहीसे स्वरुप वाटते. सोपानदेव चौधरींची कविताही अशाच ग्रामीण जीवनातील प्राथमिक माहितीच्या वर्णनात, नाटकीपणात, रमताना दिसते. यशवंतांच्या 'न्याहरीचे गाणे'

मधील स्त्री आपल्या बोली भाषेतून आपले मनोगत व्यक्त करते आहे. परंतु तिचे बोलणे स्वाभाविक वाटत नाही. 'शीळ' ना.घ. देशपांड, 'कोळयाचे गाणे, अनंत काणेकर, 'पाह्यलं गंदारी' सोपानदेव चौधरी इ. चे ग्रामीण जीवनाचे चित्रण केवळ वर्णनात्मक पातळीवरच राहते. त्यातही प्रणयभावनांच्या चित्रणाला प्राधान्य मिळते. हे काही ग्रामीण माणसाच्या भावभावनांशी समरस होऊ शकले नाहीत हेच खरे.

'सुगी' पाठोपाठ ग.ह.पाटील यांचा 'रानजाई' हा १९३४ साली प्रसिध्द झालेल्या कविता संग्रहामध्ये नागर जीवन जगत असताना कविमनाला वाटणारी ग्रामजीवनाची ओढ अनेक कवितांमधून व्यक्त होते. तसेच १९३८ मध्ये प्रसिध्द झालेल्या ग.ल.ठोकळांच्या 'मीठभाकर' कविता स्रंहातील कविता ग्रामीण जीवनानुभवांचा वास्तवपूर्ण अविष्कार घडविते. आपण जगलो, भोगलो ते ग्रामजीवन कवितेतून आविष्कृत करावे या प्रेरणेतून ठोकळांची ग्रामीण कविता लिहिली जाते. त्यामुळे त्यांची कविता वास्तवांच्या, जवळ जाताना दिसते. न.ल. ठोकळांच्या 'लक्ष्मी, मोटंवरलं गाणं, जात्यावरलं गाणं, गरिबीचा पाहुणचार', इ. कविता लक्षणीय आहेत. आनंद यादव आपला अभिप्राय देताना म्हणतात, ''ठोकळांची ग्रामीण कविता इतरांच्या तुलनेत अधिक सच्ची आहे. ग्रामीण कवितेला मराठी वाङ्मयात स्वतंत्रपणे प्रस्थापित करणारा व तिला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारा हा पहिला ग्रामीण कवी त्यांच्या मर्यादा लक्षात घेवूनही मानावा लागतो.

१९४१ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'शिवार' या के. नारखेडे यांच्या कविता संग्रहातील पेरणी, विनवणी, गुराखी, धान्य घरात येण्याच्या दिवसात सावकाराची जप्ती आलेल्या शेतकऱ्यांची हालाखी वर्णन करणारी 'त्या शेतकऱ्याची दिवाळी' या सारख्या काही कवितांमधून शेतकरी जीवनाचे दु:ख चित्रित होतअसले तरी ग्रामीण जीवनाविषयीच्या रम्यतेचा सूर सर्वत्र भरुन राहिला आहे.

१९५२ मध्ये 'बहिणाबाईंची गाणी' समोर आली. तेव्हा आडरानात मोहरांचा हंडा सापडावा तसा मराठी वाचक हरवून गेला. ही कविता ग्रामीण जीवनाचे खरे दर्शन मराठी वाचकाला घडवित होती. ग्रामीण जीवन त्याच्या मूळ रंगरुपासह अभिव्यक्त झाले. कारण ते अभिव्यक्त करणारे कविमन त्या जीवनापेक्षा जाणीवपूर्वक वेगळे नव्हते.

ग्रामीण माणसाचे मन आविष्कृत करणारी ही कविता पिढयान् पिढयांचे शहाणपण घेऊन येते. या कवितेला कुठली पूर्वपरंपरा नव्हती. तिची उत्तर परंपरा निर्माण होण्याचा संभवही कमीच होता. बहिणाबाईंची अनुभव घेण्याची आणि तो व्यक्त करण्याची पध्दती वेगळी होती ती त्यांची खास स्वत:ची होती.

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कवितेचा विचार प्रामुख्याने आनंद यादव यांच्या 'हिरवे जग' पासून सुरु करावा लागतो. या कविता संग्रहात १९५५ ते ६० या काळात लिहिल्या गेलेल्या कविता संकलित करण्यात आल्या आहेत. नितांत कष्टांनी भरलेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी यादवांची कविता आशयद्रव्य आणि अभिव्यक्ती याबाबत कोणत्याही प्रकारे त्या जीवनाशी प्रतारण करु शकत नाही. वास्तव जीवनाचे दर्शन यादवांनी आपल्या कवितेतून घडविले आहे. उदा. 'हिरवे जग' या कवितेत कवीने आपल्या शहरातल्या मित्राला काटयांनी आणि ढोरकष्टकांनी भरलेले हे हिरवे जग तू दुरुनच बघ अशी जाणीव करुन दिली आहे. 'लई वाटतंय' या कवितेत पोरांना शिकवांवसं वाटणाऱ्या, परंतु सदानकदा पोटाचं पिसं पाठीशी लागलेल्या शेतमजुराची व्यथा व्यक्त होते. शहरामध्ये नोकरीच्या निमित्ताने गेल्यावर व नंतर पुन्हा शेतात गेल्यावर 'मी बघ्या पाव्हना' अशी त्यांची अवस्था होते. म्हणूनच त्यांनी दिलेली 'मळयाची माती' मधील कविताही मराठी साहित्यातील ग्रामीण संवेदनशीलतेच्या कविता या प्रकारातील आविष्कारांमधला एक मैलाचा दगड आहे.

१९८० नंतरच्या पिढीतील मराठी ग्रामीण कविता समृध करणारे प्रमुख कवी म्हणून इंद्रजित भालेरावांचा उल्लेख करावा लागेल. भालेरावांची कविता जमीन, पाणी, पीक आणि शेतकऱ्याचे कष्ट या सर्वांशी निगडित आहे. शेतात राबणारा शेतकरी हा त्यांच्या कवितेचा आत्मा आहे. शेतकऱ्याच्या दु:खाबरोबर ती वाचकालाही अस्वस्थ करत जाते. मराठवाडयाचे ग्रामजीवन मराठवाडयाच्या बोलीभाषेतून अस्सलपणे आविष्कृत झाले आहे. गावापेक्षा शेती, शेतीतील अनुभव, शेतकऱ्याच्या व्यथेचा वास्तव व दाहक अनुभव पाठीशी असल्याने त्यांच्या कवितांची नाळ ग्रामीण जीवनाशी जोडलेली आहे. ग्रामसंस्कृती, कृषीसंस्कृतीचे दर्शन त्यांच्या कवितेतून घडते.

'सर्व ग्रामासि सुखी करावे ।
अन्न वस्त्र पात्रादि द्यावे ।
परि स्वत: दु:खचि भोगावे ।
भूषण तुझे ग्रामनाथा ।'

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी वर्णन केल्याप्रमाणे भालेरावांनी शेतकऱ्याचे दु:ख 'आम्ही काबाडाचे धनी' या कवितेमधून व्यक्त केले आहे.

भालेरावांच्या 'पेरा' या संग्रहात प्रामुख्याने शेती, शेतकरी, ग्रामीण जीवन आणि ग्रामसंस्कृती यांचे यथार्थ दर्शन घडते. आपले गाव, शेती आणि पीकपाण्याबाबत भालेरावांना स्वाभाविक ओढ आहे. कृषिजीवन हे प्रामुख्याने आभाळ आणि माती यांच्याशी जोडलेले आहे. आभाळाने वेळेवर वर्षाव केला नाही तर माती काहीही देऊ शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दु:खात भरच पडते. परिणामी कर्ज काढावे लागते. वेळेवर कर्ज न फेडता आल्यामुळे आत्महत्येसारखा मार्ग शेतकऱ्याला स्वीकारावा लागतो. असा हा शेतकरी सर्वांचा अन्नदाता आहे. पण त्याच्या कष्टाची, कृतज्ञतेची भावना जगाला जाणवत नाही. या व्यवस्थेला हादरवून सोडण्याचा इशारा देतात

'शीक बाबा शीक लढायला शीक
कुणब्याच्या पोरा आता लढायला शीक
गाळलेल्या घामासाठी रस्त्यावर टीक
हक्कासाठी लढ बाबा मानू नको भीक'

ही संघर्षाची भूमिका वाचकाला चिंतन करायला लावते. दलाल कोटयावधीची कज्र बुडवतात. इच्छा नसताना त्यांचे अनुकरण करण्याचे, शेतकऱ्याचे हित न जपणाऱ्या शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या पुढाऱ्यांना पराभूत करण्याचे, सरकारला उलथवून टाकण्याचा विचार अत्यंत संयमाने कवितेतून मांडला आहे.

अशा रीतीने अनेक ग्रामीण कवी गावाकडची माती जपू पाहणारा, बदलत्या वास्तवाला धीटपणे सामोरा जाणारा ग्रामीण कवी आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून काव्यलेखन करीत आहे.

थोडक्यात ग्रामीण कवितेच्या टप्प्यांचा विचार करताना जानपद गीतापासून सुरु झालेला प्रवास शेतकऱ्यांचे दु:ख व्यक्त करणारा असला तरी सुरवातीचे कवी रोमॅटिक अनुभव व्यक्त करताना दिसतात. नंतरची ग्रामीण कविता मात्र बदलत्या वास्तवाच्या जवळ जाताना दिसते. तर १९७० नंतरच्या ग्रामीण कविता मात्र दाहक वास्तवाच्या अनुभवाचा आविष्कार करताना दिसतात.

खाजगीकरणाच्या युगात मात्र शेती आणि शेतकरी दोन्हीही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. शेतकरी आत्महत्या करीत आहेत तर शेतीवर होणाऱ्या पर्यावरणाच्या परिणामामुळे शेतकऱ्यांची मुलेही शेती करण्यापेक्षा ती विकण्यात धन्यता मानत आहेत. तर राहिलेली शेतीही सरकार च्या रुपाने काढून घेत आहेत. म्हणून एक दिवस शेती, संस्कृती, रीत हे सर्व शिल्लक राहील की नाही अशी खंत व्यक्त करावी वाटते.

संदर्भ ग्रंथ :

१) अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (१८०० ते १९६०) — प्र. न. जोशी
२) ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास — चंद्रकुमार नलगे
३) १९६० नंतरच्या साहित्य चळवळीचे मूलस्त्रोत — डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
४) ग्रामीण साहित्य चळवळ — रा.रं. बोराडे
५) ग्रामीणतेचे नवे आयाम — भास्कर चंदनशिव
६) ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि समस्या — आनंद यादव
७) ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास — प्रा. चंद्रकुमार नले

८) ग्रामगीता — राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
९) ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्य— य.च.महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
१०) काव्य कस्तुरी — संपादक : मराठी अभ्यास मंडळ पुणे विद्यापीठ, पुणे.